श्रीराम शिक्षण संस्था, धा.रे. द्वारा संचालित

# श्रीराम कला महिला महाविद्यालय,

धामणगाव रेल्वे जि. अमरावती

# अरुणोदय

## २०१९-२०

पदवी व

पदव्युत्तर




Website : www.shrirammahilacollege.ac.in

Email ID: shrirammmv2000@gmail.com



Design by :
Shree Graphics &
Com. 9527590831

*** मार्गदर्शक ***

प्राचार्य डॉ. गणेश टाले

प्रा. नितीन बिहाडे    प्रा. नंदकिशोर राऊत

प्रा. डॉ. राजेश आडे

*** संपादक मंडळ ***

कु. दिक्षा बुराडे
बी.ए. भाग-१ मराठी विभाग प्रतिनिधी

कु. राणु यादव
बी.ए. भाग-२ हिंदी विभाग प्रतिनिधी

कु. पुजा ठाकरे
बी.ए. भाग-३ इंग्रजी विभाग प्रतिनिधी

*** मुखपृष्ठ ***

कु. पुनम गिरी
बी.ए. भाग-३

*** प्रकाशक ***

प्राचार्य, श्रीराम कला महिला महा. धामणगाव रेल्वे

*** अक्षर जुळवणी ***

जय काम्प्युटर्स
नगर परिषद जवळ, धामणगाव रेल्वे, मोबा. नं. ९४२२९१४३३०

*** मुद्रक ***

**श्याम प्रिंटर्स,** रेल्वे गेटजवळ, धामणगाव रेल्वे
फोन नं. २३७३११ मोबा नं. ९८९०७३७१७८, ९४२३४२५४०४

ह्या वार्षिकांकातील विचार आणि मते प्रत्येक लेखकाची वैयक्तीक असून प्रकाशक आणि महाविद्यालय त्यांचेशी सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

विद्यार्थी मैत्रिनींनो,

सत्र २०१९-२० चा 'अरुणोदय' या वार्षिकांकाचा अंक आपल्यासमोर ठेवत असतांना अतिशय आनंद होत आहे. परंतु त्या सोबतच दुःख सुध्दा आहे ते म्हणजे आज संपूर्ण जग अतिशय मोठ्या अशा संकटाला सामोरे जात आहे आपण सर्वच या संकटाशी धैर्याने लढत आहोत. अशा संकटाला घाबरुन न जाता आपण आपले मनोबल, आपले धैर्य वाढविले पाहिजे. जीवन हे सुंदर आहे तेव्हा जीवनाचा आनंद घेण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक संकटावर आपल्याला मात करायची असते. आणि हे सर्व साहित्याच्या माध्यमातून शक्य होत असते. आपल्याला भाव भावनांचे प्रकटीकरण आपण शब्दांच्या माध्यमातून शक्य व्यक्त करु शकतो आणि आजच्या तरुण पिढीला व्यक्त होण्याची अत्यंत गरज आहे आणि म्हणूनच गेल्या कित्येक वर्षापासून आम्ही 'अरुणोदय' हा वार्षिकांक काढत आहोत.

आमच्या महाविद्यालयातील बहुतेक विद्यार्थिनी ह्या ग्रामीण भागातील आहेत. तेव्हा त्यांच्यामध्ये दडलेला साहित्यिक हा या वार्षिकांक च्या माध्यमातून बाहेर येत असतो.

विद्यार्थिनींच्या सुप्त गुणांना वाव देणे तसेच त्यांच्या मध्ये असलेली सर्जनशीलता ओळखून त्यांना व्यासपीठ उपलब्ध करुन देणे हाच 'अरुणोदय' चा उद्देश आहे.

आजच्या तरुण पिढीला योग्य दिशा दाखविण्याची आवश्यकता आहे. त्यांना या जागतिकीकरणाच्या काळात स्वतःची जागा निर्माण करता यावी यासाठी त्यांच्यामध्ये असलेल्या सुप्त गुणांची जाणीव त्यांना व्हायला पाहिजे आणि हे सर्व साहित्य करीत असते.



साहित्याच्या माध्यमातून आपण आपली ओळख बनवित असतो. आमच्या अनेक विद्यार्थिनी खूप सुंदर लेख लिहीतात, कविता करतात, कथा लिहितात. खरं म्हणजे आज टाळेबंदी असतांना देखील आमच्या विद्यार्थिनींनी खूप सुंदर व अर्थपूर्ण असे साहित्य लिहिलेले आहे. यातूनच त्यांच्यामध्ये असलेली वाचनाची आणि लेखनाची रुची स्पष्ट होते. स्वतःला सिध्द करण्याची धडपड सुध्दा स्पष्ट जाणवते. म्हणजेच काय ? तर महाविद्यालयात येऊन त्या केवळ पुस्तकी ज्ञानच घेत नाहीत तर समाजातील सर्व समस्यांची जाणीव त्यांना होते म्हणजेच सर्व क्षेत्रातील ज्ञान त्या घेत असतात. त्यांच्या अनुभूतीच्या कक्षा रुंदावत आहेत. याचा आम्हाला खरोखरच खूप आनंद वाटतो आहे.

आमच्याकडे आलेल्या साहित्याचा ओघ पाहता असे वाटते की आमच्या विद्यार्थिनी भविष्यात उत्कृष्ट साहित्यिक होवू शकतात यात तिळमात्रही शंका नाही.

'अरुणोदय' मध्ये केवळ साहित्यच नाही तर महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर पडणारे व यशाचे मानकरी असलेले आमचे प्राध्यापक व विद्यार्थिनी यांची माहिती व छायाचित्र यांचा देखील समावेश आहे. तसेच वर्षभरात महाविद्यालयात राबविलेले विविध उपक्रम, कार्यक्रम इ. गोष्टींची माहिती सुध्दा आहे म्हणजेच हा वार्षिकांक वार्षिक घडामोडीचा लेखाजोखा असून प्रत्येक कृतीचे प्रतिबिंब आपल्याला यामध्ये दिसून येईल.



'अरुणोदय' हा वार्षिकांक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावा यासाठी आमचे प्राचार्य डॉ. गणेश टाले यांचे सातत्यपूर्ण आणि मौलिक असे मार्गदर्शन तसेच आमचे सहकारी प्राध्यापक वृंद व आमच्या कलाप्रेमी विद्यार्थीनी यांच्या सर्वांच्या सहकार्यामुळेच हा 'अरुणोदय' झाला, तेव्हा त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार. तसेच जय कॉम्प्युटर्स व श्याम प्रिंटर्स यांचे सुध्दा धन्यवाद.

मोठ्या कल्पकतेने व श्रमपूर्वक तयार केलेला हा वार्षिकांक आपल्या मनी रुजावा ही अपेक्षा.

धन्यवाद !

– संपादक मंडळ

## श्रीराम कला महिला महाविद्यालय, धामणगाव रेल्वे
### अभ्यासकेंद्र
## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
### केंद्र क्र. १२१७५

**सुविधा/वैशिष्ट्ये :-**

- ✦ उच्च शिक्षित व प्रशिक्षित समंत्रक
- ✦ ऑनलाईन प्रवेश
- ✦ पूर्वतयारी प्रवेश प्रक्रिया
- ✦ बी.ए. मराठी माध्यम
- ✦ बी.ए. उर्दू माध्यम
- ✦ ICT चा उपयोग करुन संपर्क सत्र
- ✦ परिक्षा पूर्वी परिक्षेची पूर्व तयारी

**वर्ष २०१९-२० प्रवेशीत विद्यार्थी संख्या :-**

- ✦ बी.ए. प्रथम वर्ष - १५०
- ✦ बी.ए. द्वितीय वर्ष - ५३
- ✦ बी.ए. तृतिय वर्ष - ४८
- ✦ पूर्वतयारी - १६
- ✦ बी.ए. प्रथम वर्ष उर्दू माध्यम - ०८



प्राचार्य डॉ. गणेश टाले
केंद्रप्रमुख
९४०५८१७८७७



प्रा. राजेश आडे
केंद्रसंयोजक
९४२०५४७०८८



प्रफुल कांबळे
केंद्रसहायक
९८८१८५४१०१

"ज्ञान गंगा घरोघरी"



### ✻ आमचे प्रेरणास्थान ✻



**मा. श्री. अरुणभाऊ अडसड**
अध्यक्ष, श्रीराम शिक्षण संस्था, धामणगाव रेल्वे

## * आमचे मार्गदर्शक *



**मा. श्री. घनश्यामजी मेश्राम**
सचिव, श्रीराम शिक्षण संस्था,
धामणगाव रेल्वे



**मा. श्री. अशोकभाऊ पनपालीया**
अध्यक्ष, स्था. व्य. स. श्रीराम कला
महिला महाविद्यालय, धा.रे.

# प्राचार्यांच्या लेखनीतून ...



श्रीराम महिला महाविद्यालय, धामणगाव रेल्वे येथील सत्र २०१९-२० चा 'अरुणोदय' वार्षिकांक आपल्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. गेल्या वीस वर्षातील 'अरुणोदय' ची वाटचाल अतिशय उल्लेखनीय राहिली आहे. गेल्या वीस वर्षात महाविद्यालयाने बरेच खडतर टप्पे पार करीत एका महत्वपूर्ण टप्प्याकडे वाटचाल सुरु केलेली आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कायम संलग्नीकरण, युजीसी कडून '१२ बी' चा मिळालेला दर्जा, ISO प्रमाणपत्र इत्यादी बाबींचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्याचबरोबर सध्या 'नॅक' मूल्यांकन करुन घेणे ही मोठी जबाबदारी महाविद्यालयावर येऊन पडलेली आहे. त्यादृष्टीने सर्व प्राध्यापक, IQAC समन्वयक, शिक्षकेत्तर कर्मचारी प्रयत्नरत आहेत. महाविद्यालयामध्ये आवश्यक बांधकाम सुध्दा करण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक त्या भौतिक व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्याचा महाविद्यालयाचा प्रयत्न आहे.

सध्या संपूर्ण जग आणि आपला देश 'कोरोना' च्या मोठ्या संकटात सापडला आहे. एका लहानशा विषाणूने संपूर्ण जगात थैमान घातलेले आहे या विषाणूंचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात फैलावत आहे. देशभर हजारो लोकांचे बळी गेलेले आहेत. कोरोनामुळे मानवजातीवर भयानक संकट आलेले आहे. संपूर्ण मानवजात संकटात सापडली आहे असे वातावरण निर्माण झालेले आहे. म्हणून कोरोनापासून बचाव करण्यासाठी प्रत्येकाने सजग राहणे आवश्यक आहे. सामाजिक/शारीरिक अंतर राखणे, वारंवार हात धुणे, सॅनिटायझेशन, मास्कचा वापर करणे, घराच्या बाहेर न निघणे, गर्दीत जाणे टाळणे, कामाशिवाय बाहेर न जाणे, 'मीच माझा रक्षक' या सर्व सूत्रांचा वापर केल्यास आपण निश्चितच कोरोनापासून बचाव करु शकतो,

कोरोनावरही लवकरच आपण मात करु असा आशावाद बाळगू या.

'कोरोना' मुळे डिजिटल आणि ऑनलाईन शिक्षणाचे वारे वाहू लागले आहे. बहुतेक महाविद्यालयांनी प्रतिरुप/आभासी महाविद्यालये, ऑनलाईन शिक्षण, डिजिटल शिक्षण सुरु केले आहे. ऑनलाईन शिक्षण ही तात्पुरती व्यवस्था असली तरी महाविद्यालयाच्या प्रत्येक घटकाने 'टॅक्नोसॅव्ही' होण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना अभ्यास क्रमाबरोबरच जीवन कौशल्ये, मूल्यशिक्षण देणे ही महत्वाची जबाबदारी शिक्षकांवर आलेली आहे.

आपला देश आज अनेक स्थित्यंतरातून जात आहे. अनेक सामाजिक समस्यांनी समाजाची अवस्था दयनीय होत आहे. महिलांवर बलात्कार, स्थून होताना मन सून्न होऊन जाते. रोजचे वर्तमानपत्र उघडले की, शेतकऱ्यांच्या आत्महत्येची बातमी कानावर पडते. या सर्व घडामोडींचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. साहित्य हा समाजाचा आरसाच असतो. आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी हे सर्व आपापल्या परीने टिपण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे निश्चितच गौरवास्पद आहे. त्यासाठी 'अरुणोदय' महत्वाची भूमिका निभावत आला आहे. आजपर्यंतचा समाजाचा इतिहास पाहिल्यास असे दिसून येते की, समाजाच्या कोणत्याही क्षेत्रामध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे सामर्थ्य केवळ तरुणाईतच असते. ज्या देशाजवळ या तरुणाईचे सामर्थ्य असते त्या देशाची भरभराट होण्यास वेळ लागत नाही. फक्त गरज असे त्या शक्तीचा वापर करुन घेण्याची. आपल्या देशामध्ये येणाऱ्या काळात संपूर्ण जगातील राष्ट्रांच्या तुलनेत तरुणांची संख्या जास्त आहे. अर्थातच कमावणाऱ्या लोकांची संख्या वाढून अवलंबीताची संख्या कमी होईल म्हणजेच देशाची महासत्तेकडे वाटचाल सुरु झालेली आहे. यावेळी तरुणांना, त्यांच्या शक्तीला, विचारांना चालना देण्याचा आम्ही 'अरुणोदय' च्या माध्यमातून प्रयत्न करीत आहो. त्यांच्या पंखांना बळ देऊन अवकाशात मुक्त संचार करण्याकरीता प्रेरणा देण्याचे कार्य 'अरुणोदय' निश्चितच करेल यात मुळीच शंका नाही.

आपल्या महाविद्यालयाची एम.ए. मराठी ची विद्यार्थीनी कु. श्रध्दा भोगे ही संगाबा अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत आलेली आहे. तसेच रासेयोचे शिबीर जळगाव आर्वी सारख्या पारधी वस्ती असलेल्या खेड्यात घेऊन विद्यापीठानेही महाविद्यालयाचे कौतुक केलेले आहे. त्यासाठी मी सर्वांचे अभिनंदन करतो.

या वार्षिकांकाच्या निर्मितीसाठी श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय अरुणभाऊ अडसड, सचिव श्री. घनश्यामजी मेश्राम, म.वि.स. अध्यक्ष मा. अशोकभाऊ पनपालिया, आमदार मा. प्रतापदादा अडसड, संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचेही मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे. संपादक मंडळ, प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थिनी आणि पालक यांचा वार्षिकांकाच्या निर्मितीत मोलाचा वाटा आहे. 'अरुणोदय' वार्षिकांकास माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

- डॉ. गणेश क. टाले
प्राचार्य

◆◆◆◆◆



## * यशाचे मानकरी *



डॉ. राजेश आडे
Ecological Spiritual Significance In Tagore's Gitanjali Awards PhD in December 2019
SET qualified in October 2019



डॉ. योगेश काशीकर
Ph.D. Topic :
"The Depiction of Human Life in the Works of Jhumpa Lahiri with Special Reference to the Namesake, Unaccustomed Earth, Interpreter of Maladies" June 2019



कु. श्रध्दा भोगे
एम.ए. (मराठी) मध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ गुणवत्ता यादीत



कु. काजल काळे
(बी.ए. भाग-२)
ऑल इंडिया हँडबॉल स्पर्धेकरिता संत गाडगेबाबा अम.विद्यापीठ अमरावती च्या चमुमध्ये निवड



कु. साक्षी देशमुख
(बी.ए. भाग-३)
उत्कृष्ट रा.से.यो. स्वयंसेविका



कु. समिक्षा बुटले
सांस्कृतिक प्रतिनिधी (बी.ए. भाग-३)

## ✲ मार्गदर्शक ✲



डॉ. गणेश टाले



प्रा. नितीन बिहाडे



प्रा. नंदकिशोर साकत



प्रा. डॉ. राजेश आडे

## ✲ संपादक मंडळ ✲



कु. दिशा बुराडे
बी.ए. भाग-१
संपाक मराठी विभाग



कु. राणु यादव
बी.ए. भाग-२
संपादक हिंदी विभाग



कु. पुजा ठाकरे
बी.ए. भाग-३
संपादक इंग्जी विभाग



कु. पुनम गिरी
मुखपृष्ठ



## ✲ महाविद्यालयीन कर्मचारी ✲



अनुक्रमे : प्राचार्य डॉ. गणेश टाले, प्रा. मोनाली गिर्हे, प्रा. नंदकिशोर साकत, प्रा. अभिजीत गेल, प्रा. नितीन बिहाडे, प्रा. राजेश आडे, प्रा. सुधीर पावडे, प्रा. योगेश कालिंकर, डॉ. निता केणे, प्रा. सुवर्णा घोपे, प्रा. सदाशव पाटील, प्रा. रजनीकांत ठोंबरे, अजय कुळकर्णी, राजेश वैष्णव, राजेश वारले, नागोराव रामपुरे, संतोष शिरसोले, कल्पना चव्हाण, शरद गवारले, प्रफुल्ल कांबळे

# अंतरंग

## ■ मराठी विभाग ■

**लेख / कविता इतर :**



स्त्री जन्माला नकार नको / परीक्षा / उरले फक्त सांगण्यापुरते गाव / रडूबाई रडू / मैत्री / आजच्या स्त्रीचे जीवन / माझी आई / अतूट मैत्री / सासु-सुन / लोकसंख्येचे दुष्परिणाम / बेस्ट फ्रेन्ड / दारुची बाटली / चला नां नातं रिचार्ज करु / जीवनातले क्षण / मुलींचे शिक्षण - प्रगतीचे लक्षण / आयुष्य / बाप / अजून काही / धूळ पेरणी / निवडणूक / आजच्या काळातील स्त्रियांची स्थिती / आई बाबा / मैत्री / आई थोर तुझे उपकार / आयुष्य तेच आहे / कॉलेज मधील जीवन / मैत्री / आई / व्यथा मुलीची / आई म्हणजे / चारोळी / आई / हे मानवा / जगायचं कुणासाठी ? / घर / अभिशाप / चारोळी / आयुष्याला द्यावे उत्तर / शिक्षक / वेळ ही महत्वाची असते / मन / माझी माय /



## ■ हिंदी विभाग ■

**लेख / कविता / इतर :**



नारी का सम्मान / कन्यादान / सुनो द्रोपदी शस्त्र उठालो / जिन्दगी जिन्दगी नही होती / फौजी / रोशनी की बात करे / चारोळी / कॉलेज लाईफ / चलती का नाम जिन्दगी / हाय रे परीक्षा / हिंदी दिवस पर कविता / दोस्ती है कैसी / दोस्ती / शायरी

## ■ English Section ■

**ARTICAL, POETRY & OTHER :**



Arunima Sinha / Success Thoughts of William Shakespeare / Wntil We Meet Agai Laws of Success / College is My Temple / Sarojini Naidu / Importance of Pen / Love

## ■ अहवाल विभाग ■

**अहवालाचे नांव :**



राष्ट्रीय सेवा योजना अहवाल -२०१९-२० / ग्रंथालय अहवाल २०१९-२० / शारीरिक शिक्षण विभ अहवाल २०१९-२० / सांस्कृतिक अहवाल - २०१९-२० / भौगोलिक सहल अहवाल २०१९-२०२०.



# मराठी विभाग



HAPPY MARATHI LANGUAGE DAY

# स्त्री जन्माला नकार नको

''प्रत्येक यशस्वी पुरुषामागे स्त्रीचाच हात असतो'' हे वाक्य काही खोटे नसून खरेच आहे. कारण अनेक यशस्वी पुरुषामागे स्त्रीचा हात आहे. मग ती स्त्री त्याची आई, बहिण, पत्नी, मावशी इत्यादीपैकी कोणीही असू शकते, पण ती एक स्त्रीच असते. उदा. शिवाजी महाराजांच्या मागे त्यांच्या आईचा म्हणजेच जीजाबाई यांचा हात आहे. जर जीजाबाईनी शिवाजी महाराजांना मदत केली नसती तर आज शिवाजी महाराजांचे नाव इतिहासात दिसले नसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना रमाबाई यांनी फार मदत केली. अशाप्रकारे अनेक यशस्वी पुरुषामागे स्त्रीचाच हात आहे. त्याच स्त्रीच्या जन्माला समाज नकार देतो. असे का ? एकीकडे तीच स्त्री पुरुषाप्रमाणे काम करत आहे, तीने पुरुषाला घडविले. तीच्याच जन्माला समाज नकार देतो. आजच्या काळात हे प्रमाण कमी आहे पण पूर्वीच्या काळात स्त्रयांना अन्याय, अत्याचार सहन करावे लागत होते. त्यांना समाजात स्थान मिळत नव्हते. त्यांना कुटूंबातील कोणत्याही महत्वाच्या निर्णयात सहभागी होवू देत नव्हते, तिला समाजात कनिष्ठ दर्जाचे मानले जात असे व पुरुषाला वरिष्ठ दर्जाचे. जो पुरुष घडला त्याला घडविण्याचे कार्य हे एका स्त्री ने केले हे समाज विसरुनच गेला आहे. जर मुलगी झाली तर पूर्वीच्या काळातील लोक म्हणत असे की,

''ज्यांनी केले असेल पाप
त्याला मुली होईल आपोआप''

म्हणजे मुलगी काय पाप आहे काहो. तिला लोक पाप सुध्दा म्हणतात ती काय खरोखरच पाप आहे काहो, तिच तर समाजामध्ये सुधारणा करते. तिच समाज जागृत करते, भारताला पुरुष प्रधान असलेला देश म्हणतात. तस पाहिल तर भारताला स्त्री प्रधान असलेला देश म्हणायला हवे, कारण भारतातली स्त्री ही अंतराळात जावून आली. ती राष्ट्रपती पदापर्यंत जाऊन पोहोजली, तरी देखील खरंच ती स्वतंत्र झाली का ? तर नाही ती अजूनही पूर्णपणे स्वतंत्र झाली नाही. वर्तमान पत्राचे पान उघडून पाहिले तर दररोज स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराच्या बातम्या आपण सर्वचजन वाचतो, एकीकडे तीला शक्तीचे रुप म्हणतात. देश स्वतंत्र झाला तरी ती स्त्री स्वतंत्र झाली का ? तर याचे उत्तर नाही हे राहील, कितीही झाले तरी स्त्री ही स्वतंत्रपणे आजही जगू शकत नाही, कारण ती जर मनमोकळेपणाने समाजात वावरली तर म्हणतात घरुन बंधन नाही. शांत, गंभीरपणे वावरली तर म्हणतात फेस करण्याची हिम्मत नाही. लग्न लवकर केले तर म्हणतात अफेअर लपवायचे असेल, लग्न उशिरा केले तर म्हणतात तिच्यात दोष असेल, शिक्षण कमी घेतले तर मागासलेली आहे, शिक्षण जास्त झाले तर टवाळखोर आहे असे म्हणतात. मग तिने जगावे तरी कसे; म्हणून म्हणावेसे वाटते की,

तिने या दुतोंडी जगात
जगावे तरी कसे ?
निरपराध असतांना
मरावे तरी कसे ?

हाच प्रश्न तिच्या समोर येवून उभा राहतो. आपण जगावे तर जगावे कसे व निरपराध म्हणजे कोणताही अपराध न करता मरावे तरी कसे हेच तिला समजत नाही. असच जर पुरुषामध्ये घडल तर लोक त्याला काहीच म्हणत नाही.



एकीकडे म्हणतात की, स्त्री-पुरुष समानता आहे व आपण पाहतो तेव्हा मात्र चित्र हे वेगळच दिसते. जर स्त्री-पुरुष समानता असती तर दोघांनाही सारखेच अधिकार असते पण तसे नाही, पूर्वीच्या काळात विधवा स्त्रीला दुसरे लग्न करता येत नव्हते, सती प्रथा होती. केशवपन प्रथा होती. हे सर्व स्त्रीलाच भोगावे लागत असे, जर एखाद्या पुरुषाची बायको मेली तर त्याला दुसरे लग्न करता येत होते. त्याची पहिली बायको असतांनाही तो दुसऱ्या स्त्रीशी लग्न करत होता. मात्र त्या स्त्रीचा पती असतांना तिला दुसऱ्या पुरुषाशी लग्न करु देत नव्हते. याला स्त्री-पुरुष समानता मानता येणार नाही. आताच्या काळात कामाबद्दल असे दिसून येते की, तीच जास्त काम करते व वेतन पुरुषांना जास्त मिळते. दोघेही काम करतात मग त्यांना सारखाच मोबदला मिळायला हवा तो त्यांना मिळत नाही.

''स्त्री आहे प्रेमाचा भंडार
दुःखाचा करी ती नाश
होई अन्यायाचा विनाश
असाच आहे स्त्रीचा स्वभाव''

जेव्हा आपल्याला दुःख होते ते आपण बाबाला न सांगता आईला सांगतो, म्हणजेच पुरुषाला न सांगता एका स्त्रीलाच सांगतो कारण आपल्याला माहित असते की, आपल्या दुःखाचा नाश तीच करु शकते, पुरुष नाही. आपल्याला साधा ताप जरी आला तर रात्रभर आपल्यासाठी ती जागते. तीचा स्वभाव हा सगळ्यांपेक्षा वेगळा असतो. जेव्हा एखाद्या स्त्रीला बाळ होते तेव्हा विचारणारे सर्वचजण विचारतात काय झालं? मुलगा झाला की, मुलगी झाली ? फक्त तीच विचारते माझ बाळ कसं आहे? कारण तीला दोन्ही समान वाटते. विचारणाऱ्यांना सांगितल की मुलगा झाला तर आनंद होतो, आणि मुलगी झाली की डोक्यावर आठ्या पडतात. कारण मुलाला वंशाचा दिवा म्हटले जाते, तर मुलीला दिव्याची ज्योत म्हणायला काय लाज वाटते का ? जसा दिवा हा ज्योतीशिवाय पेटत नाही तसाच वंश मुलीशिवाय चालणार नाही. कुटूंब हे मुलीशिवाय म्हणजेच स्त्रीशिवाय पूर्ण होत नाही.

डॉ. ए.पी.जे कलाम यांनी २०२० साली भारत देश महासत्ता बनला पाहीजे असे स्वप्न पाहिले होते ? परंतु आज २०२० हे साल सुरु होऊन २ महिने पूर्ण झाले तरी आपल्याला कुठेच अस दिसत नाही की त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी धावपळ करित आहे. जर खऱ्या अर्थाने आपल्याला त्यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करुन दाखवायचे असेल तर प्रत्येक स्त्री ही जीवन जगली पाहिजे, ही जबाबदारी सरकारची नसून प्रत्येक कुटूंबाची व कुटूंबातील प्रत्येक व्यक्तीची आहे. जर कुटूंबातील प्रत्येक व्यक्तीने ठरविले की मुलगी होवो वा मुलगा होवो मला दोन्ही समान आहेत तर समाजात व कुटूंबात प्रत्येक मुलीला मान, सन्मान दिला जाईल. जर पुरुषाने मुलीला मारुन न टाकण्याचा निश्चय केला तर नक्कीच येणाऱ्या काळात भारत देश हा महासत्ता बनू शकेल. स्त्री ही करुनेची मूर्ती असली तरी प्रसंगी तिला चंडीका व्हायला वेळ लागत नाही, म्हणून म्हणावेसे वाटते की,

''नारी निंदा क्यो करते हो, नारी तो रतन की खान है
इस नारी के पैदा हूये, राम, रहीम और हनुमान है।''

**'बेटी बचाओ, बेटी पढाओ'**




कु. प्रतिक्षा चौधरी
(बी. ए., भाग १)

◆◆◆◆◆

## ✲ परीक्षा ✲

परीक्षा आली की
आईची असते कटकट
आई म्हणते की
गणित सोडव पटापट

परीक्षा आली की
येतो कंटाळा मला
एकच विषय आवडतो
तो म्हणजे चित्रकला

परीक्षा आली की,
भरा भूगोलाच्या नकाशात
भूगोल विषय संपला की
येतो विषय भाषा

परीक्षा आली की
काढा शास्त्राची आकृती
तेव्हा मात्र बिघडते
आमचीच प्रकृती

परीक्षा आली की
इंग्रजीचे स्पेलींग पाठ करा
नंतर मात्र इतिहासाच्या
सनावळ्या पाठ करा

परीक्षा आली की
शाळेला मारावी वाटते बुट्टी
असं वाटतं केव्हा लागते
उन्हाळ्याची सुट्टी



कु. प्रियंका वागडे
(बी. ए., भाग २)

◆◆◆◆◆

## उरले फक्त सांगण्यापुरते गाव

बदलली सर्व माणसे
बदलले सर्व गाव
उरले फक्त गावचे
सांगण्यापुरते नाव

कधी कधी दाटतात
बालपणीच्या आठवणी
अजूनही मनात घोळतात
प्रेमळ माणसे जुनी

पण आता गाव वाटते
खूप खूप परके
राहिले नाही आता ते
आपले पाणवठ्यासारखे

पूर्वी इथे असायची
माणसा माणसात ओढ
दृष्टव्या पाहुणचाराला
जगात नव्हती तोड

आता भरले आहे
नसानसात राजकारण
बोलावे तरी कुणाशी
आपल्याच तोऱ्यात प्रत्येकजण

आपलेच ओढतात इथे
आपल्याच माणसांचे पाय
मग परक्यांनी ओढले
तर त्यांचा दोष काय

तरी सुध्दा वाटते जावे
अजूनही आपल्या गावी
जुन्या घरात एखादा
परत आपुलकी शोधावी

कु. अश्विनी पा...
(बी. ए., भाग २)

◆◆◆◆◆



## रडूबाई रडू...

रडत रडत सुमा
शाळेत उशिरा आली
बाईपुढे येताच मग
पुरती घाबरुन गेली...

बाई बोलल्या तिला
उशीर का गं झाला ?
शाळेत वेळेवर यायचं
माहीत नाही का तुला ?

सुमा रडत म्हणाली
मी पडले होते बाई
आईलाही विचारा
मी खोटं सांगत नाही

बाई पटकन म्हणाल्या
कुठं पडलीस बरं ?
रडू नको बाळा
तू सांग मला खरं

सुमा म्हणे बाई मी
अंथरुणावर पडले
पडल्या पडल्या झोपेत
लगेच जाऊन दडले

पुढे काय घडले
कळले नाही काही
उठल्यावर घड्याळ पाहून
मीच रडले बाई

बाई हसून म्हणाल्या
अगं, एवढी नकोस रडू
नाहीतर सर्व म्हणेल तुला
रडूबाई रडू !



- कु. रेश्मा बोरकुटे
बी.ए., भाग -२

◆◆◆◆◆

## मैत्री

मैत्री...
तिची ना माझी !!
तिची माझी गोष्ट जरा वेगळीच आहे,
म्हणायला मैत्री पण जगावेगळी कहाणी आहे !

दररोज रुसवाफुगवी अन वादावादी आहे,
म्हणायला जीवलग पण विळ्या-भोपळ्याची जोडी आहे !

दूर कोसांवर दोघींची घरटी आहेत,
दिसायला विभक्त पण मनाने एकरुपी आहे !

एकत्र येण्यासाठी नाना खटाटोपी आहेत,
भेटल्यावर अळीमिळी पण जन्माची गट्टी आहे !

खरपं सांगतो तुम्हाला अनोखी गट्टी आहे
दूर एकमेकांपासून आहे पण अगदी जीवलग अशी
मैत्री आहे !!



- कु. साक्षी देशमुख
बी.ए., भाग -३

स्वप्न थांबलं की आयुष्य थांबत
विश्वास उडला की आशा संपते...
काळजी घेणे सोडलं की प्रेम संपत...
म्हणून
स्वप्न पहा..., विश्वास ठेवा...
आणि
काळजी घ्या...

- कु. रेश्मा बोरकुटे
बी.ए., भाग -२

◆◆◆◆◆

# आजच्या स्त्रीचे जीवन

पूर्वीच्या काळात कुल सांभाळण्यापासून तर आजच्या काळात एखाद्या देशाची सत्ता सांभाळण्यापर्यंतचा स्त्रीच्या प्रगतीचा हा प्रवास थक्क करणारा आहे. जर्मनीच्या अँजेला मेर्केल, भारताच्या सोनिया गांधी, बांग्लादेशाच्या शेख हसीना, ऑस्ट्रेलियाच्या ज्युलिया गिलार्ड, म्यानमारच्या लोकशाहीसाठी झटणाऱ्या स्यू की ही स्त्री ने केलेल्या प्रगतीची काही उदाहरणे आहेत. अर्थात पूर्वीच्या काळातही स्त्री राज्यकर्त्यांची काही निवडक उदाहरणे आहेत, पण ती घराणेशाहीचा एक भाग होती व केवळ नामधारी स्वरूपाची होती. अलीकडच्या काळात मिळालेल्या संधीचा योग्यपणे उपयोग करून प्रत्येक वेळी स्वतःला पुरुषांच्या बरोबरीने सिद्ध करत स्त्रीने केलेली ही वाटचाल अद्भुत आहे.

काळानुसार बदलणारी व आधुनिकतेकडे वळणारी सामाजिक परिस्थिती, स्त्रीयांचा शिक्षणात वाढलेला सहभाग आणि परिणामी मिळणारे वैचारिक स्वातंत्र्य आणि आर्थिक स्वावलंबन, पुरातन काळापासून चालत आलेल्या संस्कृतीचा होणारा ऱ्हास व तात्कालीक परिस्थिती या अनुषंगाने स्वतःमध्ये बदल करण्याचा मनुष्याचा स्वभाव ही स्त्रीच्या प्रगतीची महत्त्वाची कारणे आहेत. पाश्चिमात्य जीवन पद्धतीचा उदय, जागतिकीकरणामुळे झालेला प्रसार व प्रसारमाध्यमांमध्ये झालेली प्रगती हे सुध्दा याला कारणीभूत आहेत. त्यात कार्यक्षमता, निर्णयक्षमता कोणतेही काम करण्याची क्षमता अथवा चिकाटीमुळे स्त्रीया आज सर्व स्तरावर आपापली भूमिका छान वठवताना दिसतात. देशातील बहुसंख्यक लोकप्रिय कार्यक्षेत्रामध्ये स्त्रियांना आरक्षण मिळाल्यामुळे निर्णय [illegible] आहे.

अशा ह्या पुरुष प्रधान समाजामध्ये जशा स्त्रिया जास्त प्रमाणात सहभागी होतील तसा जीवन राहणीमानाचा स्तर उंचावला जाईल यात कोणाचे दुमत नसावे. समाज हा सतत बदलत असतो आणि त्याप्रमाणे सध्याची येणारी पिढी बदलते हा निसर्गाचा नियम कोणीही मोडू शकत नाही. ह्या बदललेल्या परिस्थितीत मात्र काही स्त्रिया चुकणाऱ्यांच्या वाईट व्यसनांच्या आधीन होत असतांना पाहून येणाऱ्या काळाची चिंता वाटते, कारण स्त्री शिकली की कुटुंब शिकते.

जग एवढ्या मोठ्या प्रमाणावर पुढे जात असतांना येथील काही देशांमध्ये स्त्रियांची परिस्थिती अजून सुध्दा हलाखीची असल्याचे जाणवते. मध्य आशियातील आखाती देश व आफ्रिकेतील काही देश याची ठळक उदाहरणे आहेत. समाज परिवर्तनाला विरोध करणाऱ्या कट्टर पंथी लोकांनी व्यापलेला समाज व त्यांचा उदासिनतावादी पणाला असलेला विरोध आणि आर्थिक स्तरावर झालेली कमी प्रगती ही त्याची प्रमुख कारणे होय. मोठी लोकसंख्या असलेले देशच यात कमी पडल्याचे लक्षात येते. भूतान सारख्या कमी प्रगत व लोकसंख्येने कमी असलेल्या देशामध्ये असे फार क्वचित पाहायला मिळते.

आजवरचा इतिहास पाहील्यास लक्षात येते की, येणाऱ्या काळात कधी ना कधी आजच्या स्त्रिया हया सर्व अडचणींवर मात तर करतीलच आणि बरोबरच सर्व जगाचे उदाहरण पण प्रस्थापित करतील. आणि याच येणाऱ्या काळात स्त्रियांचे महत्व सुध्दा अनन्यसाधारणपणे वाढलेले असेल आणि त्याचे कारण एकविसाव्या शतकातील स्त्रियांचे कर्तृत्व आणि दिवसेंदिवस पुरुषांच्या तुलनेत त्यांचे वाढणारे



प्रमाण असेल.

स्त्रीमुक्ती संघटनांचे कार्य - सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रातील स्त्रियांचे कर्तृत्व अष्टपैलू आहे. घरची व बाहेरची अशी दुहेरी जबाबदारी स्त्री पार पाडत आहे. आजचे स्त्री जीवन खऱ्या अर्थाने सुखी समृध्द व निर्भय होण्याची गरज आहे. ''न स्त्री स्वातंत्र्यम अर्हती'' असे पुराणात सांगितले जाते. पण पुरातनकाळी सनातन, कर्मठ संस्कारामुळे स्त्रीचे स्वातंत्र्य लयाला गेले तेव्हा तिचे परावलंबित्व सुरु झाले होते. त्याही पुरातन काळात डोकावले तर तेव्हाची स्त्री ही वेदशास्त्र संपन्न आढळते. तिला शस्त्र शास्त्राचे शिक्षण दिले जात असे. गार्गी, मैत्रेयी यासारख्या वेदशास्त्र निपुण आणि कैकेयी सारख्या युध्दशास्त्री कुशल असणाऱ्या स्त्रीया सर्व प्रकारच्या कार्यात निपूण होत्या.

आजही भारतात मुलींना मोफत शिक्षण, नोकरीत राखीव जागा ठेवलेल्या आहेत. वडीलांच्या संपत्तीचा वारसा हक्क बरोबरीचा दिला आहे. समान वेतनाचा व समान नागरिकत्वाचा दर्जा दिला आहे व सामाजीक आर्थिक समता प्रस्थापित करण्यात आली आहे. ज्या कुटूंबात स्त्री-पुरुष समानतेची जाणीव विकसीत झाली आहे. अशा घरातील मुलींनाही स्वतःचे छंद, आरोग्य, खेळ इत्यादी जोपासण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. व तिचा सर्वांगीण विकासही केला जातो.

स्त्रीच्या स्वतःच्या कार्यशक्तीला, बुध्दीला आणि कर्तृत्वाला संपूर्ण वाव मिळाला आहे. आणि समाजात तिला समान दर्जा मिळावा म्हणून स्त्रीमुक्ती चळवळी तसेच स्त्रीमुक्ती संघटना तयार झाल्या म्हणून स्त्रियांमध्ये जागृती निर्माण झालेली आहे. तसेच त्यांना त्यांच्या हिताच्या कायद्याचे ज्ञान व मदतही केली जात आहे. घटस्फोटीत, विधवा आणि निराधार स्त्रीला मानाचे जीवन जगता येण्यासाठी आर्थिक मदत केली जाते. ही मदत सर्वधर्मी स्त्रियांसाठीच आहे.

आजची स्त्री ही डॉक्टर, इंजिनियर, वकील, शास्त्रज्ञ, प्रशासकीय अधिकारी, राजनितीक पुढारी यासारख्या मोठमोठ्या महत्वाच्या पदावर अगदी जबाबदारीने काम करीत आहे. तरीही घरात ती तितकीच कर्तव्यदक्ष आहेच. तेव्हा यावरून समाज तिचे मोठेपण व कर्तुत्व आजही ठरवतो आहे.

विवाहपूर्वी जोपासलेल्या कला, छंद याकडे विवाहनंतर बऱ्याच वेळा दुर्लक्ष केले जाते. संसारातील जबाबदाऱ्यामुळे आणि वेळेअभावी विवाहपूर्वीची अष्टपैलु असणारी स्त्री विवाहानंतर केवळ चोविस तासाची बांधील अशी चाकरमानी ठरत असायची. कामाच्या ठिकाणी पाळणाघरे, जेवणाच्या सोयी, भोजनगृहे इ. योजना राबवतात त्यामुळे त्यांना सुविधा मिळते.

आजकाल गृहोपयोगी आयाधुनिक साधने जागोजागी कवडी मोल झाल्याने त्यांना वेळोवेळी फेश असे साहीत्य नित्योपयोगी वस्तु, गरजेनुसार त्वरीत मिळतात त्यामुळे तिचे घर गृहस्थीचे कार्य अगदी सोपे झाले आहे. तरीपण त्यामुळे तिला घरात आता जास्त कामाचा ताण होत नाही. हे म्हणने चुकीचे ठरते त्या व्यतिरिक्त तिला घरात मुलांकडे लक्ष देणे त्यांचा अभ्यास घेणे यात तिला लक्ष द्यायला वेळ मिळतो. त्यात तिची ओढताण होतेच. काही महत्वाच्या बाबतीत तिला स्वातंत्र्यपणे निर्णय घेण्यास मोकळीक दिल्यास खऱ्या अर्थाने समाजात स्त्रि व पुरुष समानता येईल व ती समृध्द होईल.



कु. साक्षी वानोरे
(बी.ए., भाग -१)

◆◆◆◆◆

# माझी आई

आई माझा गुरु, आई कल्पतरु
सौख्याचा सागरु, आई माझी
मांगल्याचे सार, अमृताची धार
प्रितीचे माहेर, आई माझी

'आ' म्हणजे आत्मा आणि 'ई' म्हणजे ईश्वर ! या दोघांचा सुरेख संगम म्हणजे आई होय. ईश्वराला प्रत्येकाची काळजी घेणे, माया व प्रेम देणे शक्य नव्हते म्हणून ईश्वराने प्रत्येकासाठी एक आई बनवली आहे, ही अशी शिदोरी आहे की, जी सरतही नाही उरतही नाही, आई म्हणजे साक्षात परमेश्वराची मूर्तीच असते ते म्हणतात ना, स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी हे शाश्वत सत्य आहे.

बाळाला जन्म दिल्यावर प्रत्येकजण विचारतो, काय झाल ? मुलगा की मुलगी ? पण फक्त आईच विचारते माझे बाळ कसे आहे ? का, तिला प्रश्न पडत नाही मुलगा की मुलगी ? आणि म्हणूनच ती आई असते.

आई म्हणजे काय असते ?
आई म्हणजे दुधावरची साय असते,
गोठातल्या वासराची गाय असते !!

एक कथा सांगते, एक मुलगा असतो त्याचे आपल्या आईवर खुप प्रेम असते आणि आईचेही त्या मुलावर खूप प्रेम असते. मुलगा हळूहळू मोठा होतो. मोठा झाल्याच त्याला आपल्या वाईट मित्रांची संगत लागते. वाईट मुलांची संगत लागल्यामुळे त्याचे आईवरचे प्रेम कमी होऊ लागते. याउलट तो रोज रात्री उशिरा घरी यायचा, रस्त्यात येणा-जाणाऱ्या माणसांना उलटे बोलायचा यामुळे त्याची आई वैतागली होती नंतर एके दिवशी त्याच्या एका मित्राने विचारले आपण एक पार्टी करुया का ? त्यासाठी आपल्याला पैसे लागणार, ते पैसे कुठून ? तो म्हणाला आमच्या घरी कपाटात असतील पैसे ! पण ते पैसे आई मला देणार नाही. मित्र लगेच म्हणाला. तु तुझ्या आईला मारुन टाक म्हणजे आपल्याला सहज पैसे मिळतील. मित्राच्या सांगण्यावरुन तो आपल्या जन्मदात्या आईलाच मारुन टाकतो नंतर रस्त्यातून चालत असतांना त्याच्या पायाला ठेच लागते. ठेच लागताच तो जमिनीवर कोसळतो. त्याच्या पायातून रक्त वाहू लागते. दुसऱ्या क्षणाला त्याला आवाज येतो. ''बाळा ! तुला लागलं तर नाही ना ?'' हे कानी पडताच तो जोरात ओरडतो, आई गं ! आई म्हणते बाळ तु मला मारलस ? काय गुन्हा केला होता रे मी ? आता तुला हि आई आणि आईची माया पुन्हा कधीच मिळू शकत नाही. हे ऐकताच तो मुलगा तिथेच बसून रडू लागतो. बघा किती हे आईचे प्रेम ? किती ही आईची माया ? म्हणतात ना, डोंगराआड गेलेला सूर्य पुन्हा दिसेल पण मातीआड गेलेली आई पुन्हा दिसू शकत नाही.

आई आपल्यासाठी सर्व काही करते रोज सकाळी लवकर उठून आज आपल्या नवऱ्याला, मुलांना सासू-सासऱ्यांना काय हवे, नको ते बघते. थकलेल्या सासू-सासऱ्यांची सेवा करते. मुले शाळेतून आले की त्यांना काहितरी खायला देते मग त्यांचा अभ्यास घेते. नवरा कामावरुन आला की, त्यालाही काय हवे-नको ते पाहते. सकाळी लवकर उठून स्वयंपाक, देवपूजा, धुणी-भांडी, घरातील झाडलोट, आपल्या मुलांना शाळेत पाठवते व याशिवाय सर्वात महत्वाचे म्हणजे आपल्या घरातल्या लोकांची काळजी घेते. आई ही दिव्यातील वात बनते. स्वत:ला चटके बसत असतांनाही वात मात्र जळत ठेवते आणि घरदेखील प्रकाशीत करते कवी यशवंत म्हणतात की,''आईची महती लिहित असतांना, आकाशाचा कागद आणि सागराची शाई केली तरी ती अपुरीच पडेल''.

परवा एक मैत्रीण भेटली, जवळ-जवळ ८ ते १० वर्ष आम्ही भेटलो नव्हतो. मी सहज विचारले आई कशी आहे तुझी ? ती थोडा वेळ थांबली आणि म्हणाली, ''दोन वर्षे झाली वृध्दाश्रमात असते आणि मी आजच तिला भेटून आले.'' नंतर तिने मला प्रश्न केला. तुझी आई तुझ्याकडेच असते ना ? मी म्हणाले नाही, आई माझ्याकडे नसते मीच आईकडे असते. अजून मी आईपेक्षा मोठी झालेली नाही आणि होऊ शकत नाही.

आई म्हणजे मंदिराचा उंच कळस
आई म्हणजे अंगणातील पवित्र तुळस
आई म्हणजे भजनात गुणगुणावी अशी संतवाणी
आई म्हणजे वाळवंटात प्यावे असे थंड पाणी
स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी

म्हणजे एखादा व्यक्ती जर त्रिलोकाचा मालक असेल किंवा एखाद्या व्यक्तीकडे खूप संपत्ती, पैसा, धन असेल तर आणि जर त्याच व्यक्तीकडे आई नसेल तर तो भिकारीच आहे. आई ही अनमोल असते.

शेवटी एवढेच म्हणते.

आई तुझ्या मूर्तीवानी या जगात मूर्ती नाही,
अनमोल जन्म दिला गं आई तुझे उपकार फिटणार नाहीत,
हाडाची तु काड करुनी केले रक्ताचे पाणी,
तुझ्यासारखे कष्ट गं आई केले नाही कोणी,
संताची मी दास सांगे ऐकावी ही वाणी,
अनमोल जन्म दिला गं आई
तुझे उपकार फिटणार नाहीत !!



कु. पायल लायबर
(बी. ए., भाग १)

◆◆◆◆◆

# अतूट मैत्री

मैत्री म्हणजे आपुलकीची छत्री
जीव घेण्याची खात्री,
जीव देण्याची खात्री,
रेशीम धाग्याची अतूट मैत्री...

मैत्री म्हणजे प्रेमाचा वारा
वाहत राहतो निरंतरा,
साखरेहून गोड लागे ही मैत्री
रेशीम धाग्याची अतूट मैत्री...

मैत्री म्हणजे शब्द अबोल
न सांगता समजे खोल
सुगंधा सारखी दरवळे ही मैत्री
रेशीम धाग्याची अतूट मैत्री...

मैत्री असते वटवृक्षासारखी
वाढत राहते वेलीसारखी,
उन्हात असते सावलीची खात्री
रेशीम धाग्याची अतूट मैत्री...

मैत्री म्हणजे मस्ती, मटरगस्ती
मित्रांना बघताच जाते सुस्ती,
रेशीम धाग्याची अतूट मैत्री...

कु. अश्विनी टिपले
(बी. ए., भाग २)

◆◆◆◆◆

## सासु-सुन



सासु : सुनबाई उठा आता...
सूर्य सुध्दा उगवला...

सून : तुम्हाला फक्त तेवढच दिसतं
सूर्य माझ्या आधी झोपायला जातो...
ते नाही दिसत तुम्हाला...

कु. पूजा मरगडे
(बी. ए., भाग ३)

◆◆◆◆◆

# लोकसंख्येचे दुष्परिणाम

आजच्या काळात फोफायलेली ही महागाई बेरोजगारी, हिंसाचार, दहशतवाद, आतंकवाद, धर्मवाद, प्रांतवाद अशा अनेक वादांकरिता आंधळी भूमिका घेतलेला हा मानव.

मनुष्य हा केवळ आजच्या जगात फार स्वार्थी बनत चालला आहे. तो केवळ पैसा कशाप्रकारे कमविला जाईल याचाच विचार सतत करीत असतो. त्यांच्यामते पैशामध्ये सर्वकाही अंतर्भूत झालेलं आहे. थोडा पैसा का नाही आला त्यांच्या जवळ की तो स्वत:ला फार मोठा व्यक्ती समजतो आणि आपल्या पैशाच्या शक्तीवर तो इतरांना ज्ञान वाटण्याचा प्रयत्न करतो आणि ही भोळी-भाबडी जनता त्या व्यक्तीला फार मोठा ज्ञानी मनोमनी मानते.

परंतू या भोळ्याभाबड्या जनतेच्या लक्षात येतच नाही की काहींकडे वरील वादांचा विषय निर्माण झालेला आहे तर काही लोक दोन्ही हातांनी अतोनात पैसा लुटत आहेत. याचे काय कारण असावे ?

आज व्यक्तींना रहायला घर नाहीत ज्यामुळे ते दिसेल त्या जागी आपली झोपडी टाकुन संसार थाटण्याचा प्रयत्न करतात आणि त्या झोपडीत दोन जीव असतील त्यात दोघा-दोघांची पून्हा भर पडते आणि ही परमेश्वराची कृपा आहे. असे त्यांचे म्हणने असते.

आज आपण एखाद्या गावात जावून बघितलं तर प्रत्येक घरात आठ-दहा व्यक्तीचे कुटूंब सहज दिसून येते. आपणास नेहमी आढळून येते की, जिकडे, तिकडे मानवाचे थवे च्या थवे आहेत. जिकडे तिकडे मोकळ्या भूमीचे स्वरुप बदलून निघाले. जंगले नष्ट करुन त्याजागी लोकांनी आपल्या झोपड्या बांधून वास्तव्य सुरु केलेले आहे आणि इथल्या भूमीचे जवळ-जवळ अस्तित्वास नष्ट केलेले लक्षात येते.

वरील सर्व गोष्टीचे उगमस्थान हे लोकसंख्या वाढ आणि अशिक्षतपणा असावा यात शंकाच नाही.

सरकार लोकसंख्या नियंत्रणाकरीता आणि साक्षरतेकरीता विविध माध्यमातून लोकांना जागृत करण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतू काही राजकारणी लोक या अशिक्षित भोळ्याभाबड्या लोकांना भडकावून आपल्या राजकीय स्वार्थासाठी त्याचा उपयोग करुन घेतात.

कुणी राजकीय पार्टी आपल्या स्वार्थाकरीता परमपूज्य श्री रामाला बाजारात घेवून निघाले तर कुणी राजकीय पार्टी मंडल आयोग हा यादाचा विषय घेवून आपले अस्तित्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहे. आणि याकरीता त्यांच्या भांडणात सहभाग घेणारे आणि त्याच्याकडून दोन पैसे घेवून, खावून आपल्या अशिक्षित बांधवांना तात्पुरते समाधान तर लाभते. पण कधीकधी तर त्यांना आपले प्राण सुध्दा गमवावे लागतात आणि भडकविणारे प्रतिनिधी सुरक्षित गंमत बघत राहतात.

आजचे नवतरुण युवक पानठेल्यावर उभे असता आणि तिथल्या वाईट व्यसनांच्या आधीन झालेले कित्येक उदाहरण आपणास दिसतील.

याचे मुख्य कारण लोकसंख्या वाढ आहे. त्यामुळे बेरोजगारीची अतोनात वाढ झालेली आहे. एका सर्वसाधारण व्यक्तीच्या संसारात जर आपण डोकावून बघितलं तर आपणास आढळून येईल की या संसारात पडलेली काळजी किंवा चिंता ही उद्यालापोटात काय टाकावे अशी असते.

कित्येकांना रोज भाकरी-चटणीवर दिवस काढावे लागत आहे. पोटभर जेवण सुध्दा मीळत नाही. किती विचित्र अवस्था झाली त्यांना सुध्दा इतरांसारख राहावस वाटत असेल, गाडीत फिरावस वाटत असेल.

आपल्याला माहीत आहे अमेरीका, जपान हे देश आपल्या परीने १००० वर्षे पुढे आहेत आपण विचार करु शकणार नाहीत की तिथल्या सर्वसाधारण व्यक्तीजवळ गाडी, बंगला आणि भरपूर पैसा आहे. यांना कोणत्याही गोष्टीची कमतरता भासत नाही. आपणास तिथे भिकारी दिसनार नाही, कुणी बेकार दिसणार नाही. कारण तिथले लोक साक्षर आहेत आणि लोकसंख्या नियंत्रीत आहे. त्यामुळे ते या सर्व सुख सोयीचा उपभोग घेवू शकतात.

आपणास सुध्दा आपल्या या भोळ्या भाबड्या बांधवांना साक्षर करुन लोकसंख्येला आळा घालुन इतर देशांसारख सुख समाधानाने जीवन जगता येईल.

- कु. पुजा ठाकरे
(बी. ए., भाग -३)

◆◆◆◆◆

## बेस्ट फ्रेन्ड

मला वाटायचं तिचं माझ्यावर जीवापाड प्रेम आहे
फक्त मी विचारायची देरी आहे
मलाही ती प्रचंड आवडायची
जेव्हा ती मला आपला बेस्ट फ्रेन्ड म्हणायची,
मनातलं गुपीत फोडायची,
खुप रागवायची, माझ्याशी भांडायची, गप्पा मारायची,
माझ्या कविता ऐकायची
त्यांना उत्स्फुर्त दाद द्यायची, माझ्यावर प्रेम करायची
पण मला माहित नव्हतं
ती मला फक्त
आपला बेस्ट फ्रेण्ड म्हणायची.



कु. मेघा इंदुरकर
(बी. ए., भाग २)

◆◆◆◆◆

## दारुची बाटली

अशी का गं मोठा होते त्याच्या भोवती
घराचा गं नाश केला माझे सवती.
त्यांना कसा लागुन गेला तुझा चटका
जवळ नाही थांबत माझ्या दोन घटका
बाई मी साधी, भोळी त्यांना तुझी गोडी
आजवरी तुझी त्यांना चटक नव्हती
घराचा गं नाश केला माझे सवती.
त्यांना कसा लागुन गेला तुझा नाद
तुझ्यापायी जीवन माझं होईल बरबाद
जडेल तुझे वेड, नशिबी माझ्या रड
सोडून कामधंदा तुझ्या माग धावती
घराचा गं नाश केला माझे सवती.
घर माझं वाया गेलं तुझ्यापायी सारं
नसून कोणता गुन्हा मला रोज देतो मार
नाही मला कळत, बसते मी रडत
वेळोवेळी हरपली येडे लागती
घराचा गं नाश केला माझे सवती.
आता मला सारी तुझी ओळख पटली
तुलाच म्हणतात ती दारुची बाटली
संसाराचे गाठोडे केले माझे वाटोळे
म्हणुनच सारखे लोक तुला दुर ठेवती
घराचा गं नाश केला माझे सवती.



कु. पुजा मसने
(बी. ए., भाग ३)

# चला नां नातं रिचार्ज करु

आपल्यातलं बोलणं संपल असेल तर
पुन्हा एका टॉक टाईम भरु...
चला ना, पुन्हा एकदा नातं रिचार्ज करु...
मनामध्ये काही अडलं असेल तर
त्या वाईट गोष्टींना फॉरमॅट मारु...
चला ना, पुन्हा एकदा नातं रिचार्ज करु...
नवा घेवून पुन्हा कॅनव्हस
नव्या चित्रात नवे रंग भरु...
चला ना, पुन्हा एकदा नातं रिचार्ज करु...
प्रेमाचा नेट पॅक, समजुतीच बॅलेन्स
हृदयाच्या व्हावचरवर पुन्हा स्क्रॅच करु...
चला ना, पुन्हा एकदा नातं रिचार्ज करु...
उतार-चढाव ते विसरुन सारे
उद्यासाठी नात्यांवर पुन्हा टॉर्च मारु...
चला ना, पुन्हा एकदा नातं रिचार्ज करु...
माणुस म्हटल तर चुकणारच ना
चुका तेव्हढ्या बाजुला सारु...
चला ना, पुन्हा एकदा नातं रिचार्ज करु...
आयुष्याची बॅटरी रोज लो होते
जवळचे नाते तेवढे आवळुन धरु...
चला ना, पुन्हा एकदा नातं रिचार्ज करु...
व्यक्ती तितक्या प्रकृत्तीचा नियम
पटलं तेवढं ठेवून बाकी इग्नोर मारु...
चला ना, पुन्हा एकदा नातं रिचार्ज करु...
कांद्याचे कापसुध्दा डोळे भिजवतात
नात्यांचेही खाचे तसेच स्विकारु...
चला ना, पुन्हा एकदा नातं रिचार्ज करु...
नव्या ताकदीने नव्या उमेदीने
निसटणारे हात पुन्हा घट्ट धरु...
चला ना, पुन्हा एकदा नातं रिचार्ज करु...
सुसंवादाची सेल्फी आठवत
रिलेशनमध्ये अंडरस्टँडींग भरु...
चला ना, पुन्हा एकदा नातं रिचार्ज करु...



- कु. निकिता टोकसे
(बी. ए., भाग - २)

◆◆◆◆◆

# जीवनातले क्षण

वणवा पेटला
विझवणार कोण
वादळ, वारा
रोखणार कोण
निसर्ग नियम
तोडणार कोण
प्रितीचा खेळ
मोडणार कोण
नयनातले स्वप्न
उधळणार कोण
जीवनातलं सत्य
नाकारणार कोण...



- कु.अश्विनी टिपले
(बी. ए., भाग - २)

◆◆◆◆◆



# मुलींचे शिक्षण - प्रगतीचे लक्षण

'एक सुशिक्षित आई ही शंभर शिक्षकांपेक्षा श्रेष्ठ आहे.'हा आपल्या राष्ट्रपित्याचा संदेश अनमोल आहे. कारण ज्या घरातील स्त्री शिकलेली आहे, ते घर कधीच अशिक्षित राहणार नाही. तरीपण आजही आपल्या देशातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण हे पन्नास टक्क्यांपेक्षाही कमी आहे.

खर पाहता, आज महाराष्ट्र शासनाने मुलींना पहिलीपासून पदवीपर्यंतच्या शिक्षणाची मोफत व्यवस्था केली आहे. त्याशिवाय 'सावित्रीबाई दत्तक पालक' योजनेतून तिला शिक्षणासाठी येणाऱ्या इतर खर्चातून मदत मिळू शकते. हे स्त्रीने सिद्ध केले आहे. तरीही आपल्या देशातील स्त्रिया शिक्षणाची समस्या कठीण का झाली आहे ?

'किशोरी प्रशिक्षण' या प्रकल्पामुळे आता स्पष्ट झाले की, स्त्री शिक्षणात अनेक अडथळे आजही उभे आहेत. वर्षानुवर्षे आपल्या समाजात स्त्रीला शिक्षणासाठी विरोधच होता. चूल आणि मूल सांभाळायला शाळेत कशाला जायला हवे, अशी मनोधारणा होती. स्त्रीवर अनेक बंधने होती. आजचा समाज या समजुतीतून बाहेर थोडा थोडा पडला आहे. तरीपण ग्रामीण भागात स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत उदासीनता दिसून येते.

स्त्री शिक्षणातील मुख्य अडचण आहे गरीबी. गरीबीमुळे शासनाने दिलेल्या अनेक सोयीसवलती त्यांच्यापर्यंत पोहचवू शकत नाहीत. गरिबीने ग्रासलेला माणूस मुलांच्या शिक्षणाचा विचार करु शकत नाही. त्यांत भर असते ती पालकांच्या अज्ञानाची. आपल्या बाळांना शिकवले तर आपले व त्यांचे भवितव्य बदलेल, ही जाणीवच या पालकांना नसते.

काही पालकांना जाणीव झाली, तरी परिस्थिती त्यांना अगतिक करते. उदरनिर्वाहासाठी त्यांना दिवसरात्र राबावे लागते. आई-बाबा कामावर गेल्यावर लहान भावंडांना सांभाळण्याची जबाबदारी मोठ्या भावंडावर विशेपत: मोठ्या मुलींवर येते. काही ठिकाणी घरातील खर्च भागविण्यासाठी मुलींनाही कामावर जावे लागते. घरकाम, शेतकाम अशा विविध कामात गुंतलेली मुले शिक्षणापासून वंचित राहतात. आता 'बालकामगार विरोधी' कायदाही झाला आहे. पण तेवढ्याने प्रश्न सुटेल का ?

मुलांना शिकवण्याचा मुद्दा आला की, मुलींपेक्षा मुलाला शाळेत पाठवण्याला प्राधान्य मिळते. कारण तो वंशाचा दिवा असतो ना ! याशिवाय शाळेत जाणाऱ्या मुलींना समाजकंटकापासून होणारा त्रास, शाळा दूर असणे याही गोष्टी स्त्रीशिक्षणाच्या आड येतात. काही कुटूंबे पोटासाठी गावोगाव हिंडत असतात, मग त्यांच्या मुलांना शिक्षण कोठून व कसे मिळणार ? 'शाळा तुमच्या दारी' फिरत्या शाळा अशा काही मार्गांनी या समस्या सोडवण्याचा प्रयत्न काही सामाजिक संस्था करत आहेत, पण ते प्रयत्न अपुरेच पडतात.

जोवर स्त्रिया साक्षर, सुरक्षीत होत नाहीत तोपर्यंत समाज निकोप होणार नाही. कारण अज्ञानातून अंधश्रध्दा, अविवेक या गोष्टी येतात. म्हणूनच ज्योतीराव फुले सांगतात की, 'विद्येविना सर्व काही व्यर्थ' आहे.



कु. वैष्णवी वेळूकार
(बी. ए., भाग १)

◆◆◆◆◆

## आयुष्य

आयुष्यभर सोबत असून
जवळ कधी बसत नाही.
एकाच घरात राहून आम्ही
एकमेकास दिसत नाही.
हरवला तो आपसातला
जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकास दोष देवून
नित्य चाले वादविवाद
धाव धाव धावतो आहे
दिशा मात्र कळत नाही
ह्रदयाचे पाऊल कधी
ह्रदयाकडे वळत नाही.
इतकं जगून झालं पण,
जगायलाच वेळ नाही
जगतो आहोत कशासाठी
काहीच कसला मेळ नाही
क्षण एक येईल असा,
घेऊन जाईल हा श्वास
अर्ध्यावरच थांबलेला
असेल जीवन प्रवास
अजूनही वेळ आहे
थोडं तरी जगून घ्या
सुंदर अशा जगण्याला
डोळे भरुन बघून घ्या.



कु. भारती म्हात्रे
(बी. ए., भाग ३)

◆◆◆◆◆

## बाप

मुलीच्या लग्नापर्यंत कडक वाटणारा बाप
लग्नानंतर इतका हळवा कसा होतो.
मुलीसाठी जितक करता येईल तितकं
जीवाच रान करत राहतो.

घरात असताना जास्त न बोलणारा,
लग्नानंतर फोन, मॅसेज करुन चौकशी करत राहतो.
आधी डोळे वटारुन पाहणारा आता डोळे भरुन निरोप देतो.
मुलीच्या लग्नानंतर बाप इतका हळवा कसा होतो.

कधी कोणाला काही न बोलणारा
स्वत:वर अन्याय झाला तर वेळ मारुन नेणारा,
मुलीसाठी मात्र जगाविरुध्द उभा राहतो.
मुलीच्या लग्नानंतर बाप इतका हळवा कसा होतो.

पाहुणे आले तर फारसा फरक न पडणारा
जावयाची मात्र खुप वाट पाहतो
मुलीची पहिल्यापेक्षा जास्त काळजी घेतो
मुलीच्या लग्नानंतर बाप इतका हळवा कसा होतो.

कु. रानु यादव
(बी. ए., भाग २)

◆◆◆◆◆





## अजून काही

तुझ्या नभाला गडे किनारे अजून काही
तिथेच जाऊन वेच तारे अजून काही
जरी सुखाच्या निवांत दारास मी नकोसा
खुली व्यथाची सताड दारे अजून काही
तसा न रस्त्यात आज धोका मला परंतू
घरात येतात वाटमारे अजून काही
गडे मला सांग माझीतुझी वंदता
विचारते गाव हे विचार अजून काही
तुम्ही कुठे आमच्या दिशा बंदिवान केल्या
सणाणती बंडखोर वारे अजून काही
थकून गेलो तरी फुलांचा सुरुच हेका
अजून गा रे अजून गा रे अजून काही
करु नका एवढ्यात चर्चा पराभवाची
रणात आहेत झुंजणारे अजून काही
विझुन माझी चिता युगे लोटली तरीही
विझायचे राहिले निखारे अजून काही

- कु. करीश्मा जवंजाळ
बी.ए., भाग - २

◆◆◆◆◆

## धूळ पेरणी

असो बरकत धूळ पेरणीला,
लागला मातीचा जीव झुरणीला

हिरव्या पिसांचा ध्यास धरणीला,
टिपूर मोत्यांची आस मोरणीला.

येऊ नये कधी दिवस जाचक,
कासावीस डोळे बनले चातक

कोरडे नक्षत्र पूर पापणीला,
आलेलं आभूट दूर दाटणीला

मिळता डोळ्यांना मेघुट इशारे,
मातीच्या कणांना फुटले धुमारे

- कु. अश्विनी नारे
बी.ए., भाग - १

◆◆◆◆◆

## निवडणूक

निवडणूकीच्या काळात भोंगे मात्र
भो-भो करुन फिरत असतात
अहो, कशाला हवा आहे हा भोंगा
आणि कशाला हवा आहे हा प्रचार
जरा मैदानात उतरा आणि मग
खेळा खऱ्या निवडणूका.
गनिमी कावा कसा खेळायचा
तो मात्र शिकवला आमच्या छत्रपतीने...



- कु. वैष्णवी धोटे
बी.ए., भाग - ३

पण छुपा वार कसा करायचा
तो मात्र शिकवला तुमच्या राजकारणाने
अहो, पैसे वाटून किंवा किराणा वाटून
तुम्हांला मत विकत घेता येणार नाही...
तर मतासाठी लोकांच्या
ह्दयात जाऊन शिराव लागतं
तेव्हाच कुठला झेंडा फडकवायला
हाथ पसरवावा लागत नाही.

# आजच्या काळातील स्त्रियांची स्थिती

सोनिया गांधी पहा राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्याकडे पहा म्हणजे आधुनिक स्त्रीची वाटचाल आपोआप लक्षात येईल.

स्त्री च्या परीक्षेचे पूर्वीचे दिवस आता इतिहासजमा होत आहेत हळूहळू स्त्री जातीत उत्क्रांती घडून आली, काही समाजसुधारक स्त्रियांनी स्त्रीला सुध्दा माणसाएवढा अधिकार आहे आणि तो तिला मिळावा म्हणून जागृतीचे कार्य केले . काही स्त्रियांनी देशाच्या संरक्षणाकरिता स्वत:ला वीरगती प्राप्त करुन घेतली. धर्ममार्तंडाच्या आदेशानुसार कोणत्याही धर्माप्रती कार्य करण्याची संधी स्त्रियांना मिळवून देण्यात पंडिता रमाबाई, कर्वे, अहिल्याबाई होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिलांचा उध्दार करण्याचे व्रतच घेतले होते. जेव्हा स्त्री शिक्षणावर पुरुषप्रधान संस्कृतीने बंदी आणली होती त्या काळात स्त्रियांना साक्षर करण्याचा विडा सावित्रीबाई फुल्यांनी उचलला आणि मुलीची पहिली शाळा सुरु केली त्याही वेळेस उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या समाजाकडून त्यांना प्रोत्साहन तर मिळालेच नाही परंतू त्यांच्यावर चिखलफेक करण्यात आली त्याला न जुमानता सावित्रीबाईंनी आपले स्त्रियांना शिक्षित करण्याचे कार्य धाडसी वृत्तीने सुरुच ठेवले त्यांना समाजातील इतर स्त्रियांचे चांगले सहकार्य लाभले स्त्रियांना पशु समान लेखणाऱ्या समाजाच्या तोंडावर या सुधारक स्त्रीने जणू थापडच मारली त्याकाळी स्त्रिया या अत्याचार सहन करण्यासाठीच जन्माला येतात अशीच भावना पुरुषप्रधान संस्कृतीत दिसून येते. पायातील वाहन पायातच ठेवावी अशी भावना पुरुषामध्ये रुजलेली होती.

काळ बदलत गेला स्त्रियांना स्वत:चे अस्तित्व जाणवायला लागले, समाजजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्री ही पुरुषाची बरोबरी करायला लागली. 'चूल आणि मूल' ही संकल्पना स्त्रीने पिटाळून लावली निरपेक्ष लोकशाही राज्यात स्त्रियांचा दर्जा हा पुरुषा एवढाच आहे हा ठाम विश्वास स्त्रियांमध्ये निर्माण झाला, शिक्षणाची धर्मशास्त्राची दालने स्त्रियांसाठी मोकळी झाली शिक्षणाच्या क्षेत्रातही स्त्रियांनी मजल गाठली.

आज २० व्या शतकात स्त्री हि पुरुषांपेक्षा अर्थार्जनाच्या क्षेत्रातही समोर आहे. महिलांच्या संघटना तयार झाल्या, आर्थिक विकासाच्या अनुषंगाने विविध व्यवसायात स्त्रिया अग्रणी झाल्या. समाजकारण, राजकारण, खेळ, क्रीडा, शिक्षण, कला, साहित्य, वैद्यकशास्त्र, विधी व न्याय यंत्रणा, देशाच्या शासनकर्ता म्हणून आजची स्त्री प्रत्येक ठिकाणी पुरुषांच्या बरोबरीने कार्य करत आहे. राष्ट्राची धुरा सांभाळण्यापासून तर कुटूंब प्रमुखापर्यंत स्त्रीच्या क्षेत्राची कक्षा रुंदावली आहे. विज्ञानाच्या क्षेत्रात अनेक संशोधक स्त्रिया आहेत. भारताचे पंतप्रधानपदी इंदिरा गांधी सारख्या स्त्री ने सलग अकरा वर्षे देशाचे नेतृत्व सांभाळले. ग्रहाव जाण्यापासून तर एवरेस्ट सर करण्यापर्यंत स्त्री गेली आहे आता स्त्री ही चार भिंतीच्या आत राहून केवळ पती व कुटूंबापर्यंत मर्यादित राहिलेली नाही तर जीवनाच्या विविधांगी क्षेत्रात प्रवेशित झालेली आहे. शासनाने सुध्दा स्त्रियांना आज आरक्षण देऊन त्यांचा सन्मान केला आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने स्त्रीकडे सन्मानाच्याच व आदराच्याच भावनेने पहावे असे कार्य आजच्या स्त्री चे आहे तुरुंगाधिकारी पासून तर टॅक्सी चालकापर्यंत स्त्रिया पुरुषांच्या पाठीशी पाठ लावून विकासास सहाय्य करत आहे.

कालची स्त्री समाजाच्या अत्याचाराला बळी पडणारी होती परंतु अशा समाजाला वठणीवर आणण्याची समर्थता आजच्या स्त्रमध्ये आहे. ममता व वात्सल्य मात्र आजही कालच्या स्त्रियांप्रमाणेच आजचीही स्त्री सांभाळून आहे. 'चूल आणि मूल' या जबाबदारी सोबतच इतरही क्षेत्रात त्यांनी स्वत:ला वाहून घेतलेले आहे पण अजूनही महिलांचे प्रश्न पूर्णपणे सुटलेले नाहीत.

- कु. आरती चामलाटे
(बी. ए., भाग -१)

◆◆◆◆◆

# आई बाबा

जन्माला घालून लेकराला
आई-बाबा होई पणती
अखंड तेवतसे जीवन
नसे कोणती काळजी

सावलीत ते बालपण
शांत सुखकर हे वाढे
दोघातच जीवन सारे
बाकी जग हे खोटे

नैराश्याच्या जीवनाला
आई-बाबा आधार देई
व्याकुळ या जीवनाची
बनतात अशी पाणपोई



विसरु नका त्यांना
एकांतात दोघेच असे
कितीही वाईट वागलो
तरी साथ त्यांचीच असे.

- कु. ज्योत्स्ना राऊत
(बी. ए., भाग -३)

◆◆◆◆◆

# मैत्री

तुझ्या मैत्रीवर कितीही लिहीलं
तरी उनं वाटत
सारं आहे माझ्याकडे आज
तरी कुठतरी सुनं वाटतं

तुझ्या मैत्रीचे क्षण
पुन्हा हवेहवेसे वाटु लागतात
आज मन माझं लख्ख आकाश
त्यात तुझ्या आठवणीचे ढग दाटु लागतात.

तुझ्या मैत्रीची गर्द सावली
अशी आयुष्यावर दाटली होती
आयुष्यातली उन्हं माझ्या
तुझ्याचमुळे आटली होती

तुझ्या मैत्रीच्या आठवणी
मी आजही जपून ठेवतो
आनंदाचे ते क्षण हरवु नयेत म्हणून
काळजाच्या तिजोरीत लपुन ठेवतो.



मन माझे वेडे
पुन्हा एकदा त्या क्षणांचा शोध घेतात.
अन शब्द माझे कवितेतून
तुझ्या मैत्रीचा वेध घेतात.

- कु. पूजा मरगडे
(बी. ए., भाग -३)

# आई थोर तुझे उपकार

रामायणात महर्षी वाल्मीकींनी रंगवलेले प्रभू रामचंद्र म्हणतात. जननी जन्मभूमीच स्वर्गादिप गरीयसि । खरोखरच किती अचूक वर्णन आहे हे ! आईपुढे स्वर्गाचेही माहात्म्य थिटे पडते. आईच्या प्रेमाची बरोबरी कोणतीही शक्ती करु शकत नाही. कवी मोरोपंत आईचे माहात्म्य सांगतांना म्हणतात – इतरांनी कितीही प्रेम केले, माया केली तरी त्यांचे 'प्रसाद पट' हे थिटे ठरतात. तसे आईचे नसते. तिची माया कधी आटत नाही. अगदी आपल्या कुपुत्रालाही ती विटत नाही.

माझीही आई अगदी अशीच आहे. आजचे माझे यश पूर्णपणे माझ्या आईमुळेच मला मिळाले आहे. परवाच शाळेतील विविध स्पर्धांत मला बक्षिसे मिळाली. माझे हस्ताक्षर हे सर्व विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरापेक्षा उत्कृष्ट ठरते, याचे संपूर्ण श्रेय माझ्या आईकडे जाते. लहानपणी अनेकदा मी लिहीलेल्या मजकुरातील हस्ताक्षर पसंत पडले नाही की आई मला तो लिहायला लावी. परंतु परत लिहिल्यामुळे माझे अक्षर घोटीव व वळणदार झाले.

मला आठवतेय, मी चौथीत असतांना माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षेच्या वेळी परिक्षेला जाण्यापूर्वी मला अचानक उलट्या व्हायला लागल्या. मी परिक्षेला घाबरायचो. कशीबशी परिक्षा संपवून मी घरी आलो. आईने ओळखले, याला परीक्षेची भिती वाटते. मग पाचवीपासून तिने मला शाळाबाह्य अनेक परिक्षांना बसवले आणि आता कोणत्याही परिक्षेची मला भीती वाटत नाही. पाचवीपासून परिक्षेचे मला अजिबात भय वाटत नाही.. असे घडवले मला माझ्या आईने. म्हणूनच मनात येते, 'न ऋण जन्मदेचे फिटे.'

माझ्या आईने माझ्यासाठी स्वतःच्या 'करिअर' चा कधीच विचार केला नाही. ती स्वत: एम.एससी. असूनही मी लहान असतांना तिने कधी नोकरीचा विचार केला नाही. मी आठवीत गेल्यावर तिने पी.एचडी. केली, तीही शिष्यवृत्ती मिळवून अभ्यास करतानाही ती घरातील सर्व कामे करत होती.

माझ्या आईचे माझ्या प्रत्येक गोष्टीकडे बारीक लक्ष असते. मी काय वाचावे, कोणकोणत्या स्पर्धांत भाग घ्यावा, याकडे तिचे कटाक्षाने लक्ष असते. तिच्या वाचनात काही चांगले आले की, ती आवर्जून मला वाचायला सांगते; पण माझे निर्णय मीच घ्यावेत याबाबत ती आग्रही असते. खरोखरच आई आपल्या मुलासाठी किती कष्ट उपसत असते. जिजाऊने शिवाजीला स्वराज्याची प्रेरणा दिली. महात्माजींच्या मनात सत्याचा आग्रह त्यांच्या मातेने ठसवला, तर भूदानाची कल्पना विनोबांना सुचली ती आईच्याच शिकवणूकीतून, विनोबांची आई म्हणे, विन्या, आपल्याजवळ पाच घास असतील, तर त्यातील एक तरी दुसऱ्याला द्यावा. आई हा थोर गुरु आहे. म्हणून तर बापूजी म्हणत, 'एक आई शंभर गुरुहूनही श्रेष्ठ आहे.' आजच्या काळातील दहशतवाद, भ्रष्टाचार वगैरे सामाजिक व समाजविधायक गोष्टी विषयक बोलत असतांना परवा आई म्हणाली, प्रत्येकाने लक्षात ठेवावे की, प्रत्येकालाच असते आई. खरेच प्रत्येकाने आपल्या मातेच्या शिकवणूकीचा विचार केला तर हिंसकाचे हात हिंसा करतांना थबकतील.

आईने आपल्यासाठी केलेल्या या सर्व गोष्टी आठवल्या की मनात येते, लहानपणापासून आईचा विरह ज्याच्या वाट्याला आला असेल, त्याचे केवढे दुर्भाग्य ! म्हणून कवी यशवंत म्हणतात.



'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी'

कु. वैष्णवी वेलूकार
(बी. ए., भाग १)

◆◆◆◆◆



# आयुष्य तेच आहे

आयुष्य तेच आहे, स्वप्नं खोटेचे आहे
भानावर येताच, वास्तवाचे घटकेच आहे
आयुष्य तेच आहे, मधुर गाणेच आहे
निसर्ग छेडी संगीत, लयबध्द होणेच आहे.
आयुष्य तेच आहे, माणसांचे मढेच आहे
एखादं दुसरा सजीव, बाकी निर्जीव पुतळेच आहे
आयुष्य तेच आहे, सांगतात सारेच आहे
एक सारख वाटत नाही, आयुष्य कुठेच आहे.
आयुष्य तेच आहे, अधांतरी वाटेचं आहे
मृत्युच एक सत्य बाकी खोटेचं आहे
आयुष्य तेच आहे, सौंदर्यावर भाळलेच आहे
मी मागितला चंद्र, हात पाळलेच आहे
आयुष्य तेच आहे, वेडे म्हणणारे खुळेच आहेत
शहाण्यांची ओळख, वेड्या मुळेच आहे
आयुष्य तेच आहे, प्रश्न वाकडेच आहे
मनाला जे पटतं, मेंदूसाठी कोडेच आहे
आयुष्य तेच आहे, हलके फुलकेच आहे
आठवणी राहिल्या मागेल समाधान इतुकेच

कु. कोमल खाब्रागडे
(बी. ए., भाग २)

◆◆◆◆◆

## चारोळी

कधी कधी जीवनात इतक बेधुंद व्हाय लागतं
दुःखाचे काटे टोचतांनाही खळखळून हसाव लागत
